ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २४ • गुरुवार दि.१५ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## निवडणूक आयोगाला सुप्रिम कोर्टाची नोटीस

### मोर्चा प्रकरणी राहुल गांधी,अखिलेश यादव यांनाही नोटीस



नवी दिल्ली:मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतील (एसआयआर) कथित अनियमितता आणि मतदारांची नावे वगळण्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी व इंडिया आघाडीच्या नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (१५ ऑक्टोबर) निवडणूक आयोगाला नोटीस बजावली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्याकडून न्यायालयाने उत्तर मागविले आहे. त्याचवेळी १२ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने काढलेल्या मोर्चाप्रकरणी राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव आणि अन्य संबंधितांनाही नोटीस बजावण्यात आली आहे.

राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेत मतदार याद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मतदारांची नावे वगळताना पारदर्शकता राखावी, वगळलेल्या नावांची यादी आणि त्यामागील कारणे जाहीर करावीत, तसेच पात्र मतदारांना आपले नाव पुन्हा समाविष्ट करण्याची संधी द्यावी, अशा मागण्या याचिकेत करण्यात आल्या आहेत. या याचिकेची दखल घेत सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने संबंधितांना नोटीस बजावली. ही याचिका एसआयआर संदर्भातील प्रलंबित प्रकरणांसोबत सुनावणीसाठी जोडण्यात येणार आहे.दरम्यान, याचिका दाखल करण्यापूर्वी राहुल गांधी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने मोर्चा काढला होता. या मोर्चामुळे न्यायालयाच्या परिसरात मोठी गर्दी झाली होती. **पान ४ वर**

## जि.प.चे माजी अधिकारी कोमावाड यांचे अनोखे 'भिक मांगो' आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी- नांदेड जिल्हा परिषदेचे माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी कोमावाड यांनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर अनोख्या पद्धतीने भिक मांगो आंदोलन सुरू करून प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

जिल्हा परिषदेचे निलंबित उपमुख्य कार्यकारी अधिकारी कोमावाड यांना काही दिवसांपूर्वी भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन निलंबित करण्यात आले होते. प्रशासनात महत्त्वाच्या पदावर काम केलेल्या अधिकाऱ्यालाच आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी हातात भांडे घेऊन जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करावे लागले. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. सामान्य नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी किती संघर्ष करावा लागत असेल, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. गळ्यात




मला न्याय पाहिजे असा ठळक फलक आणि हातात भांडे घेऊन कोमावाड यांनी आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचे **पान ४ वर**




कुसुमनगर वाघलवाडा येथील एम.व्ही.के.उद्योग समुहाच्या चौथ्या साखर कारखान्याचा शुभारंभ आज माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी खा.डॉ.अजित गोपछडे, माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, एम.व्ही.के.उद्योग समुहाचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी, संदीप कवळे पाटील यांच्यासह इतर मान्यंवर दिसत आहेत.

## धर्मांतरानंतर जातीच्या आधारे आरक्षण नाही-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली:हिंदू धर्मातून इस्लाम धर्म स्वीकारल्याने संबंधित व्यक्तीला पूर्वीच्या जातीच्या आधारावर मागासवर्गीय मुस्लिम आरक्षणाचा लाभ आपोआप मिळू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (१५ ऑक्टोबर) दिला. तामिळनाडू सरकारने दाखल केलेले आव्हान फेटाळत न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

तामिळनाडू सरकारने ९ मार्च २०२४ रोजी शासनादेश काढून मागासवर्गीय, अतिमागासवर्गीय, विमुक्त समुदाय आणि अनुसूचित जातींतील व्यक्तींना इस्लाम स्वीकारल्यानंतर मागासवर्गीय मुस्लिम प्रवर्गात समाविष्ट करण्याची तरतूद केली होती. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाने हा आदेश असंवैधानिक ठरवत रद्द केला होता. या निर्णयाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, धर्मांतरापूर्वीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारे नव्या धार्मिक समुदायातील मागासवर्गीय दर्जा आपोआप मिळत नाही. संबंधित मुस्लिम समुदायात समावेश होण्यासाठी त्या प्रवर्गाचे निर्धारित निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.या प्रकरणातील याचिकाकर्ते समीर अहमद यांचे पूर्वीचे नाव परमशिवम होते. त्यांनी २०१५ मध्ये इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर मुस्लिम लेब्बाई समुदायाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, तहसीलदारांनी अर्ज फेटाळल्याने त्यांनी मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर तामिळनाडू सरकारच्या शासनादेशाच्या वैधतेचा प्रश्न न्यायालयासमोर आला.सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीच्या दर्जासंदर्भातील १९५० च्या घटनात्मक आदेशाचाही संदर्भ दिला. या आदेशानुसार हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मीयांनाच निर्धारित अटींच्या अधीन राहून अनुसूचित जातीचा दर्जा मिळू शकतो. इस्लाम धर्म स्वीकारल्याने अनुसूचित जातीचा दर्जा कायम राहत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.या निकालामुळे धर्मांतरानंतर आरक्षणाचा दावा करण्यासंदर्भातील कायदेशीर भूमिका स्पष्ट झाली असून, तामिळनाडू सरकारचा शासनादेश रद्द करण्याचा मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम राहिला आहे.

## कमी पाण्यात,लवकर येणाऱ्या चारा पिकांचे बियाणे प्रशासनाकडून उपलब्ध करुन देणार

नांदेड/प्रतिनिधी-अल-निनोच्या प्रभावामुळे पाणीटंचाईची शक्यता असून आगामी काळात पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भेडसावण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने चारा मित्र ही संकल्पना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वतःच्या शेतात पाण्याची उपलब्धता असलेल्या आणि चारा पिकांची लागवड करण्यास इच्छुक व्यक्तींना प्रशासनामार्फत कमी पाण्यात व लवकर येणाऱ्या चारा पिकांच्या वाणांचे बियाणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी अधिकाधिक पशुपालकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. चारा लागवडीसाठी इच्छुकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून चारा मित्र म्हणून नाव नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कर्डिले यांनी केले आहे.चारा मित्र संकल्पनेअंतर्गत लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याचा प्रथम संबंधित पशुपालक आपल्या पशुधनासाठी वापर करू शकतील. त्यानंतर उपलब्ध होणारा अतिरिक्त चारा गरजू पशुपालकांच्या पशुधनासाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर चाऱ्याची उपलब्धता वाढण्यास तसेच संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यात १८२ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून या दवाखान्यां मार्फत पशुपालकां-पर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी विलंब न करता संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून नोंदणी करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

## विज्ञान प्रदर्शनात सायन्स कॉलेजचे विद्यार्थी द्वितीय

नांदेड/प्रतिनिधी-श्री चैतन्या टेक्नो स्कूल येथे पार पडलेल्या नांदेड विज्ञान प्रदर्शनात स्थानिक 'सायन्स कॉलेज, नांदेड'च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत माध्यमिक गटात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत सायन्स कॉलेजचे विद्यार्थी मुग्धा देशमुख, हर्षद नागेश्वर, सायली कांबळे व मयूर पांडे यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक प्रा.आकाश करंडे, प्रा. दुलेवाड प्रा. शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच यातील विद्यार्थी मुग्धा देशमुख, हर्षद नागेश्वर आणि प्रा.आकाश करंडे यांची विज्ञान



सफरीसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल, सचिव प्रा. श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, तसेच सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. पी.शिंदे सर, पप्राचार्या डॉ. अरुणा शुक्ला, उपप्राचार्य प्रा. एकनाथ खिल्लारे, पर्यवेक्षक प्रा. सतीश बैनवाड, जेएनसी कन्व्हेनर प्रा. एच ए धीरबसी, निबंधक गौतम वाघमारे, नांदेडचे गट-शिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, विस्तार अधिकारी श्री भालके, आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना पुढील टप्प्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## माहूर गडावर ललित पंचमी उत्साहात;देवी चरणी भक्तिरसाचा जल्लोष



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूरगडावरील श्री रेणुका देवी संस्थानमध्ये ललित पंचमी उत्सव आज (गुरुवार) दि.१५ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच गडावर घंटानाद, शंखनाद आणि सनईच्या मंगल सुरांनी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. देवीच्या दर्शनासाठी भाविकांची उपस्थिती आणि विविध धार्मिक विधींमुळे गडावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

उत्सवाच्या निमित्ताने सकाळची महापूजा भवानीदास भोपी आणि शुभम भोपी यांच्या हस्ते विधिवत संपन्न झाली. यावेळी विश्वस्त, पुजारी वर्ग तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. महापूजेनंतर चतुर्वेद पारायण, श्री दुर्गासप्तशती पठण, शतचंडी पाठ, फुलोरा, छबिना आणि मुख्य महाआरती असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. त्यानंतर देवीसमोर ललित पंचमी जागरणाला प्रारंभ झाला. नाशिक येथील सनईवादक नितीन धुमाळ यांनी सकाळच्या सनईवादनातून भक्तिमय स्वरांची सुरेल मेजवानी सादर केली. त्यांच्या वादनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. कुमारिका पूजन आणि सुवासिनी पूजनाच्या माध्यमातून देवीचरणी भक्तिपुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी श्री रेणुका मातेला पांढऱ्या मोत्यांच्या रंगछटांचे अलंकारिक महावस्त्र परिधान करण्यात आले होते. फुले आणि फळांनी सजविलेल्या आकर्षक आरासेमुळे देवीचे रूप अधिकच मनमोहक दिसत होते. ललित पंचमीच्या निमित्ताने खा.नागेश पाटील आष्टीकर आणि कृष्णा पाटील आष्टीकर यांनी श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन आरती केली. विविध धार्मिक विधी, सनईवादन आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे माहूरगडावर ललित पंचमीचा उत्सव भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला.

## 'सीजेपी'च्या पत्रकार परिषदेत गोंधळ

### दास,रांकांच्या अटकेविरोधात शुक्रवारी आंदोलन

नवी दिल्ली:कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) सदस्य सौरभ दास आणि आशुतोष रांका यांच्या अटकेच्या निषेधार्थ आयोजित पत्रकार परिषदेत जोरदार घोषणाबाजी झाल्याने गोंधळ उडाला. पत्रकार परिषद बंद करा अशा घोषणा देण्यात आल्याने वातावरण तणावपूर्ण झाले. या पत्रकार परिषदेला नेहा बोरा आणि अभिजीत दिपके यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

पत्रकार परिषदेदरम्यान झालेल्या गोंधळावर प्रतिक्रिया देताना अभिजीत दिपके यांनी घोषणाबाजी करणाऱ्यांवर टीका केली. ५० ते १०० रुपयांसाठी गोंधळ घालणारे हे लोक आहेत, असा आरोप त्यांनी केला. या प्रकारामुळे पत्रकार परिषदेतील वातावरण अधिकच तापले.जंतरमंतर परिसरातील आंदोलनासंबंधी निर्बंध लागू असताना सौरभ दास आणि आशुतोष रांका हे काही सहकाऱ्यांसह तेथे पोहोचले होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले. या कारवाईच्या निषेधार्थ सीजेपीच्या वतीने पुन्हा आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली आहे.अभिजीत दिपके यांनी शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता कॅनॉट प्लेस परिसरात एकत्र **पान ४ वर**

# राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला

यंदा अल निनोच्या प्रभावामुळे राज्याच्या अनेक भागांत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतीचे अर्थकारण कोलमडले आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली, सोयाबीनसारख्या नगदी पिकांचा उतारा घटला आणि शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. म्हणजेच सुमारे ८५ टक्के तालुके दुष्काळाच्या छायेत आहेत. ही आकडेवारी केवळ प्रशासकीय नोंद नाही, तर राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ओढवलेल्या संकटाची गंभीर सूचना आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अग्रीम मदत देण्याची घोषणा केली. मात्र, या तुटपुंज्या मदतीने शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता कमी होणार आहे का, हा खरा प्रश्न आहे. मदत की चेष्टा?, असा सवाल त्यामुळे उपस्थित होतो. गेल्या वर्षी अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले होते, तर यंदा पावसाअभावी पिके हातची गेली आहेत. कधी ओला दुष्काळ, कधी कोरडा दुष्काळ, तर कधी पिकांवरील रोगांचा प्रादुर्भाव, अशा संकटांच्या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे. दहा क्विंटल उत्पादनाची अपेक्षा असताना दोन–तीन क्विंटलवर समाधान मानावे लागत असेल, तर शेतीचा खर्च भरून निघणार तरी कसा? बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता मावळली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली. आता उत्पन्नच मिळणार नसेल, तर कर्जाची परतफेड करायची कशी आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा, हा त्यांच्यासमोरील यक्ष प्रश्न आहे. दसरा–दिवाळीसारखे सण तोंडावर असताना शेतकऱ्यांच्या घरात आनंदाऐवजी चिंतेचे सावट आहे. मुलांचे शिक्षण, घरखर्च, कर्जाचे हप्ते आणि सणासुदीचा खर्च यांचा ताळमेळ बसवताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. अशा वेळी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर करून सरकारने आपल्या कर्तव्याची पूर्तता केली, असे समजायचे काय? ही रक्कम शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्याचा प्रयत्न असला, तरी फाटलेल्या आभाळाला ठिगळ लावण्यापलीकडे तिची परिणामकारकता किती, याचा विचार सरकारने केला पाहिजे. किमान पंचवीस हजार रुपयांची अग्रीम मदत देऊन शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देणे आवश्यक होते.दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा निर्णयही सरकारने घेतला. मात्र, सुरुवातीच्या शासन निर्णयातील अटींमुळे अनेक जातींच्या विद्यार्थ्यांबाबत संभ्रम निर्माण झाला. त्यानंतर अटी दूर करून सरसकट परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, तोपर्यंत अनेक विद्यार्थी आणि पालकांनी परीक्षा फी भरली होती. आता ही रक्कम त्यांना परत मिळणार का, याचे स्पष्ट उत्तर शासनाने द्यायला हवे. मदतीची घोषणा करायची, नंतर त्यासाठी अटी घालायच्या आणि पुन्हा त्या बदलायच्या, या प्रशासकीय गोंधळाचा फटका संकटग्रस्त कुटुंबांना बसता कामा नये. एकीकडे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची मदत जाहीर होते, तर दुसरीकडे रेल्वे कर्मचाऱ्यांना ७५ दिवसांच्या वेतना इतका दिवाळी बोनस जाहीर झाल्याची बातमी समोर येते. मंत्र्यांसाठी आणि अधिकाऱ्यांसाठी आलिशान वाहनांच्या खरेदीवर कोट्यवधी रुपये खर्च करण्याच्या प्रस्तावांचीही चर्चा होते. लाडकी बहीण योजनेसारख्या योजनांवर मोठा निधी खर्च केला जात असताना शेतीवर अवलंबून असलेल्या कोट्यवधी लोकांच्या संकटाकडे सरकारने अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विविध योजनांचे महत्त्व नाकारता येणार नाही; मात्र, प्राधान्यक्रम ठरवताना दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न केंद्रस्थानी असला पाहिजे. कोरोना महामारीच्या काळात अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला असतानाही शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे उत्पादन सुरू ठेवून देशाची अन्नसुरक्षा टिकवली. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे भाषणांत सांगितले जाते. मग संकटाच्या काळात त्याला पुरेसा आर्थिक आधार देण्याची वेळ येते, तेव्हा सरकारचे हात आखडते का? केवळ घोषणांनी शेतीचा खर्च भागत नाही आणि आश्वासनांनी कर्जाचा डोंगर कमी होत नाही. सरकारने तातडीने पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, दुष्काळी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, पीकविमा भरपाई आणि कर्जविषयक दिलासा वेळेत द्यावा. पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीपुरते न थांबता प्रत्यक्ष नुकसानीच्या प्रमाणात भरीव आर्थिक मदत जाहीर करावी. कारण शेतकऱ्याला सण साजरा करण्यासाठीच नव्हे, तर पुढील हंगाम उभा करण्यासाठीही पैशांची गरज आहे. शेतकऱ्यांच्या संकटाकडे केवळ आकडेवारी म्हणून पाहून चालणार नाही. त्यांच्या घरातील चूल पेटली पाहिजे, मुलांचे शिक्षण सुरू राहिले पाहिजे आणि पुढील पेरणीसाठी त्यांच्या हातात भांडवल उरले पाहिजे. अन्यथा, सरकारने जाहीर केलेली मदत म्हणजे 'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला' या म्हणीची आठवण करून देणारी ठरेल. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंज्या मदतीच्या घोषणा नकोत; त्यांना हक्काचा, पुरेसा आणि वेळेत मिळणारा आधार हवा. सरकारने हे ओळखले नाही, तर 'मदत की चेष्टा?' हा प्रश्न केवळ अग्रलेखापुरता मर्यादित राहणार नाही, तो राज्यातील शेतकऱ्यांच्या संतापाचा आवाज बनेल.

# लेखणीतील निर्भीडता आणि कृतीतील सामाजिक बांधिलकी!
## ज्येष्ठ पत्रकार संजीव तुकाराम कुलकर्णी यांचा प्रेरणादायी प्रवास

पत्रकारिता ही केवळ घटनांचे वृत्तांकन करणारी व्यवस्था नसून समाजातील अन्यायाला वाचा फोडणारी, वंचितांना न्याय मिळवून देणारी आणि लोकशाहीची मूल्ये जपणारी शक्ती आहे. सत्यनिष्ठा, निर्भीडता आणि सामाजिक बांधिलकी जपत चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार संजीव तुकाराम कुलकर्णी यांचा प्रवास या मूल्यांचा प्रत्यय घडवणारा आहे. दैनिक मराठवाडा, गावकरी, पुण्यनगरी, पुढारी आणि लोकसत्ता अशा प्रतिष्ठित वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी राजकारण, समाजकारण आणि जनसामान्यांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली. विशेषतः कामगार, कर्मचारी आणि संघटित-असंघटित श्रमिकांच्या समस्या व न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने लेखणी चालवली. दुर्लक्षित घटकांचे प्रश्न समाजासमोर मांडणे, ही त्यांच्या पत्रकारितेची ठळक ओळख राहिली आहे.

संजीव कुलकर्णी यांच्या कार्याचे वेगळेपण म्हणजे त्यांनी पत्रकारितेची जबाबदारी केवळ बातम्या आणि लेखांपुरती मर्यादित ठेवली नाही, तर प्रत्यक्ष सामाजिक कार्यातूनही आपली बांधिलकी सिद्ध केली. नांदेड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वाटचालीत त्यांनी दिलेली साथ याचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. पहाटेच्या अंधारात वृत्तपत्रांचे गठ्ठे स्वीकारून ते वाचकांपर्यंत पोहोचवणाऱ्या विक्रेत्यांच्या कष्टांची आणि अडचणींची त्यांना जाणीव होती. असंघटित असलेल्या या घटकाला राज्यव्यापी संघटनेच्या



माध्यमातून एकत्र आणण्याच्या प्रयत्नांत त्यांनी सक्रिय सहकार्य केले. नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेला पहिला राज्यव्यापी वृत्तपत्र विक्रेता मेळावा यशस्वी करण्यामध्ये त्यांचा वाटा मोलाचा ठरला. तसेच, पहाटे चार-पाच वाजता बाहेरगावाहून येणाऱ्या वृत्तपत्रांचे गठ्ठे सोडवून वितरणाचे काम सुरळीत व्हावे, यासाठी नांदेड महानगरपालिकेकडून सेंट्रल शेड मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या दैनंदिन कामाला सुविधा मिळवून देण्याचा हा प्रयत्न त्यांच्या कृतीशील सामाजिक जाणिवेचे प्रतीक आहे.

पत्रकारिता आणि संघटनात्मक कार्यासोबतच साहित्य व संस्कृतीच्या क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन, वाचनसंस्कृतीचे संवर्धन आणि पन्नासहून अधिक पुस्तकांच्या प्रकाशनातील सहभाग यांमधून त्यांनी समाजाच्या वैचारिक समृद्धीस हातभार लावला. पत्रकारितेतील अनुभव, साहित्याची जाण आणि सामाजिक प्रश्नांविषयीची संवेदनशीलता यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. आज माहितीचा वेग वाढला असला, तरी सत्यता, विश्वासार्हता आणि सामाजिक उत्तरदायित्व जपणारी पत्रकारिता अधिक आवश्यक झाली आहे. अशा काळात संजीव कुलकर्णी यांचा प्रदीर्घ प्रवास नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी आहे. सत्तेपेक्षा सत्याला प्राधान्य देणे, अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहणे आणि समाजातील दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांशी नाते जपणे, हा त्यांच्या कार्यातून मिळणारा महत्त्वाचा संदेश आहे.

या कार्याचा गौरव म्हणून नांदेड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेतर्फेत्यांना कॉम्रेड अनंतराव नागापूरकर राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. हा सन्मान त्यांच्या पत्रकारितेतील कर्तृत्वाबरोबरच वृत्तपत्र विक्रेत्यांसारख्या श्रमिक घटकांसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचाही गौरव आहे. लेखणीच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मांडताना प्रत्यक्ष कृतीतूनही परिवर्तनाला हातभार लावता येतो, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. त्यांच्या लेखणीला सत्याची धार लाभत राहो, श्रमिकांच्या न्याय्य हक्कांचा आवाज अधिक बुलंद होवो आणि समाजप्रबोधनाचे कार्य अविरत सुरू राहो, हीच या सन्मानाच्या निमित्ताने मनःपूर्वक सदिच्छा!

**चंद्रकांत घाटोळ**
जिल्हाध्यक्ष
वृत्तपत्र वितरक विकास मंडळ,नांदेड

# संघर्षातून कर्तृत्वाकडे...;किशनसिंह चौहान यांचा प्रेरणादायी प्रवास!

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे भोकर येथील वृत्तपत्र विक्रेते किशनसिंह चौहान!

माणसाच्या आयुष्यात परिस्थिती कितीही कठीण असली, तरी मनात जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर यशाचा मार्ग निश्चितच सापडतो. किशनसिंह चौहान यांचा जीवनप्रवास याच सत्याची साक्ष देणारा आहे. बालपणापासूनच संघर्षाशी नाते जोडलेल्या किशनसिंह यांनी प्रतिकूल परिस्थितीसमोर गुडघे टेकण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याचा आणि स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहण्याचा निर्धार केला.



किशनसिंह यांच्या आयुष्यावर अवघ्या पाचव्या वर्षी मोठे संकट कोसळले. वडिलांचे छत्र हरपल्याने कुटुंबाची जबाबदारी लहान वयातच त्यांच्या वाट्याला आली. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना सहावीच्या वर्गातच शिक्षण सोडावे लागले. मात्र, शालेय शिक्षण थांबले म्हणून शिकण्याची आणि आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याची त्यांची जिद्द थांबली नाही. अनुभवातून शिकत त्यांनी जीवनाच्या संघर्षमय वाटेवर पुढे जाण्यास सुरुवात केली.

सुरुवातीला गिट्टीशाळेजवळ दोन हातगाड्या घेऊन त्यांनी तीस रुपये महिना भाड्याने किराणा विक्रीचा व्यवसाय केला. त्यानंतर साठ रुपये महिना भाड्याने कपड्यांच्या दुकानात काम करून उदरनिर्वाहाचा मार्ग शोधला. प्रत्येक काम करताना त्यांनी कष्टाला प्रतिष्ठा दिली आणि प्रामाणिकपणाची कास सोडली नाही. पुढे वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय स्वीकारल्यानंतर त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली.

वृत्तपत्र विक्री हा केवळ व्यवसाय नसून समाजापर्यंत ज्ञान, विचार आणि माहिती पोहोचविण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. पहाटेपासून सुरू होणाऱ्या या कामात ऊन, वारा, पाऊस, सण-उत्सव अशा कोणत्याही परिस्थितीत खंड पडत नाही. वाचकांना वेळेवर वर्तमानपत्र मिळावे, यासाठी वृत्तपत्र विक्रेत्याला सातत्याने धावपळ करावी लागते. किशनसिंह यांनी गेल्या १४ वर्षांपासून हे कार्य निष्ठेने आणि प्रामाणिकपणे सुरू ठेवले आहे. स्वतःच्या अडचणींवर मात करत त्यांनी वाचकांशी विश्वासाचे नाते निर्माण केले.

वृत्तपत्र विक्रेत्यांचे योगदान समाजाच्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचे असले, तरी त्यांच्या कष्टांची दखल अनेकदा घेतली जात नाही. अशा परिस्थितीत नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त आणि भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधून आयोजित सोहळ्यात किशनसिंह चौहान यांना दिवंगत कॉ. अनंतराव नागापूरकर उत्कृष्ट वृत्तपत्र विक्रेता राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. हा सन्मान त्यांच्या १४ वर्षांच्या सेवाभावाचा, संघर्षाचा आणि कर्तृत्वाचा गौरव आहे.

किशनसिंह यांचा प्रवास सांगतो की, माणसाची ओळख त्याच्या परिस्थितीवरून नव्हे, तर त्या परिस्थितीशी तो कसा लढतो यावरून ठरते. प्रतिकूलतेला संधीमध्ये बदलणाऱ्या या कष्टकऱ्याचा सन्मान म्हणजे समाजातील प्रत्येक मेहनती हाताचा सन्मान होय.

परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द हरू देऊ नका; कारण प्रामाणिक कष्टांतूनच कर्तृत्वाचा सुगंध दरवळतो. किशनसिंह चौहान यांची यशोगाथा नव्या पिढीला स्वाभिमानाने जगण्याची, संघर्षाला सामोरे जाण्याची आणि ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा देणारी आहे.

**गणेश वडगावकर**
सचिव
वृत्तपत्र वितरक विकास मंडळ,नांदेड

# ज्ञानज्योतीतून संतविचारांचा जागर;गोकुंद्यात राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ

किनवट/प्रतिनिधी-गुरू विना ज्ञान आणि ज्ञानज्योती पेटविणारे गुरू म्हणजे देव. ही किमया फक्त ज्ञानज्योतीत आहे. दससूत्री ज्ञानज्योती कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वच्छता व प्लास्टिकमुक्ती हे पहिलं पाऊल आहे. शाळा हेच एकमेव सर्व धर्मीय ज्ञानमंदीर आहे. आम्ही संत गाडगेबाबांचा वसा घेऊन दिवसभर झाडू मारून स्वच्छता करतो. रात्री सदैव कीर्तनातून मन, मेंदू स्वच्छ करतो. विद्यार्थ्यांनो तुम्ही सुद्धा सतत अभ्यासाचे परिश्रम करा यश तुमच्या हाती असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे स्वच्छतादूत, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर (माहूर) यांनी केले.

१४ ऑक्टोबर रोजी गोकुंदा येथील म.ज्यो.फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित संतविचारांचा जागर-समाजप्रबोधनाचा गजर या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. राज्यातील सर्व शाळांमध्ये मूल्यशिक्षण, पर्यावरण संवर्धन, संत साहित्याचे महत्व विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे, शाळा परिसर स्वच्छ करून स्वच्छता, शिक्षण, राष्ट्रप्रेम, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती व भक्तीमार्ग या सप्तसूत्रीचा पायंडा कीर्तनातून मांडण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने नुकतीच नियुक्ती झाल्यानंतर राज्यातील या पहिल्या कार्यक्रमाचा शुभारंभ त्यांनी या शाळेतून केला. मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभि. प्रशांत ठमके हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी संस्थेच्या कोषाध्यक्षा तथा प्राचार्या शुभांगीताई ठमके, निवृत्त अभियंता रमेश बद्दीवार, बालभारती पाठ्यपुस्तक समीक्षेसाठी निवडलेले शेषराव पाटील, पुंडलिक हुंबे, पंजाब माने, वैभव खराटे यांची मंचावर उपस्थिती होती. आदिकर्मयोगी उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली साबळे यांनी आभार




मानले. प्रारंभी राष्ट्रपिता ज्योतीराव फुले व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पमाल्यार्पन करून राष्ट्रगीत व वंदेमातरम गीत सामूहिक गाईले. यावेळी स्वच्छता, अभ्यास व व्यसनमुक्तीची शपथ सर्वांना दिली. कार्यक्रमासाठी उप मुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक रघुनाथ इंगळे, मनोज भोयर, मुकुंद मुनेश्वर, भाग्यवान खोब्रागडे, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नोकरीच्या मागे न लागता कौशल्याधारित शिक्षण घ्या-डॉ.नासिर शेख

उमरखेड/प्रतिनिधी-आजच्या युगात नोकरीच्या मागे न लागता कौशल्याधारित शिक्षण घेऊन आत्मनिर्भर बना, असे आवाहन विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय, सवना येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नासिर शेख यांनी केले.

मिलिंद महाविद्यालय, मुळावा येथे १४ ऑक्टोबर रोजी राज्यशास्त्र विभाग व निवडणूक साक्षरता मंडळाच्या वतीने मतदार जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास दामोदर होते. प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिल काळबांडे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. दशरथ पवार, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जयमाला लाडे व ग्रंथपाल डॉ. राहुल धुळधुळे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.ज्योती खंदारे यांनी प्रास्ताविक करून अभ्यास मंडळाची कार्यकारिणी जाहीर केली व मंडळाची भूमिका स्पष्ट केली. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.१४ ऑक्टोबर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून प्रा. डॉ. काळबांडे यांनी या दिवसाचे महत्त्व व ७० वर्षातील सामाजिक विकासावर प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ. दामोदर यांनी मतदार नोंदणीचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक गावंडे यांनी तर आभार प्रदर्शन अंजली उबाळे यांनी केले. यावेळी सर्वांनी सामूहिक मतदार शपथ घेतली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड–१
**मुख्यसंपादक**–प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**–अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सायन्स कॉलेजच्या प्रांगणात युवक महोत्सवाला शुक्रवारपासून प्रारंभ

## सयाजी शिंदे,भारत गणेशपुरे यांची उपस्थिती

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेजमध्ये दि.१६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव ज्ञानतीर्थ-२०२६ रंगणार आहे. संस्थेच्या ७५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महोत्सवाचे यजमानपद मिळाले असून, ११० महाविद्यालयांतील १ हजार ६५३ विद्यार्थी कलावंत व सहभागी या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी १३ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत महोत्सवाची माहिती दिली. संगीत, नृत्य, नाट्य, एकांकिका, मूकअभिनय, लोकनृत्य, शास्त्रीय गायन, वक्तृत्व, वादविवाद, पोस्टरनिर्मिती, मेहंदी, मातीकाम, पोवाडा आणि लावणी अशा ३० कलाप्रकारांत स्पर्धा होणार आहेत. या महोत्सवात १ हजार ७५ विद्यार्थी कलावंत, २५८ संघ व्यवस्थापक आणि २१० वादक व साथीदार सहभागी होणार आहेत.महोत्सवाची सुरुवात १६ ऑक्टोबर रोजी सकाळी महात्मा फुले यांच्या पुतळ्यापासून निघणाऱ्या शोभायात्रेने होईल. सकाळी ११ वाजता साने गुरुजी मुख्य मंचावर उद्घाटन समारंभ होणार असून, जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले उद्घाटक, तर कुलगुरू





डॉ. मनोहर चासकर अध्यक्षस्थानी राहतील. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, अभिनेते भारत गणेशपुरे, नरेंद्रदादा चव्हाण आणि संस्थेचे सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर यांची प्रमुख उपस्थिती असेल.सायन्स कॉलेज परिसराला महात्मा ज्योतिबा फुले नगरी असे नाव देण्यात आले आहे. येथे साने गुरुजी यांच्यासह नाना पाटेकर, डॉ. श्रीराम लागू, पंकज उदास आणि स्मिता पाटील यांच्या नावांचे पाच मंच उभारण्यात येणार आहेत. या मंचांवर विविध कलाप्रकारांतील स्पर्धा रंगणार आहेत. ज्ञानतीर्थ-२०२६ हा महोत्सव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता सामाजिक प्रश्नांवर विचारमंथन घडवून आणणार आहे. युद्ध नको, बुद्ध हवा, अमली पदार्थांचे दुष्परिणाम आणि युवापिढीसमोरील आव्हाने, हवामान बदल : मानवी अस्तित्वासमोरील नवे आव्हान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : मानवी अस्तित्वाची व्याख्या अशा विषयांवर विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थी आपले विचार मांडणार आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन महोत्सवात अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे. शाल व पुष्पगुच्छांवरील खर्च टाळावा, तसेच स्थानिक परीक्षक आणि सहाय्यकांनी मानधनातील काही रक्कम स्वेच्छेने परत करून उपक्रमाला हातभार लावावा, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. उत्सवाच्या आनंदासोबत समाजातील प्रतिकूल परिस्थितीचे भान राखण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. सायन्स कॉलेजचे प्राचार्य तथा महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. संस्थेला ७५ वर्षे पूर्ण झाली असली, तरी यापूर्वी महाविद्यालयाच्या परिसरात युवक महोत्सव झाला नव्हता. विद्यापीठाने यंदा दिलेल्या संधीमुळे ही उणीव दूर होत असल्याचे त्यांनी सांगितले. सायन्स कॉलेज हे सामाजिक जाणीवांचे आणि पुरोगामी चळवळींचे केंद्र राहिले असून, संस्थाध्यक्ष सीए डॉ. प्रविण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक, कर्मचारी आणि पदाधिकारी महोत्सवाच्या तयारीत व्यस्त आहेत. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा स्वागताध्यक्ष सीए डॉ. प्रविण पाटील, उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव सौ. श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर आणि कार्यकारिणी सदस्यांच्या वतीने सहभागी विद्यार्थी कलावंत व मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे.

## रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी पकडला

नांदेड/प्रतिनिधी-बळेगाव ते कौडगाव रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा बुधवारी सकाळी उमरी पोलीसांनी पकडला आहे. हायवा क्र.एमएच ०४ जी.आर. ८५२८ यामध्ये नदीतून उपसा केलेली रेती भरुन घेवून जात असतांना बुधवारी सकाळी बळेगाव ते कौडगाव रोडवर उमरी पोलीसांनी सदरील हायवा पकडला. पोलीसांनी हायवा व अडीच ब्रास रेती असा ८ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी गोविंद ढगे, हनमंत माधवराव मोरे या दोन जणांविरुध्द उमरी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वीस क्वींटल सोयाबीनची चोरी

नांदेड/प्रतिनिधी-शेतात साठवून ठेवलेले सोयाबीन चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना मंगळवारी रात्री भोकर तालुक्यातील मौजे लघळुद शिवारात घडली आहे.

रामदास येरन्ना गाडे यांच्या शेतातील एक लाख रुपये किंमतीचे वीस क्विंटल सोयाबीन मंगळवारी रात्री संशयीत आरोपी दयानंद टेकाळे यांनी चोरुन नेल्याची तक्रार भोकर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# हुंड्यासाठी छळ करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

देगलूर/प्रतिनिधी-विवाहानंतर संसाराची स्वप्ने रंगवणाऱ्या नवविवाहितेच्या आयुष्यात अथवा आठ दिवसातच हुंड्याच्या मागणीने कटुता निर्माण झाली. ॲटो खरेदी करण्यासाठी माहेरहून दोन लाख रुपये घेऊन ये, असा तगादा लावत पतीने शारीरिक व मानसिक त्रास देत मारहाण केल्याची. तक्रार देगलूर पोलिसात दाखल झाली आहे. याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सुकेशनी दीपक होऊन सांगणे (वय २१) रा.सिद्धार्थनगर, देगलूर यांचा विवाह १२ जुलै २०२६ रोजी देगलूर येथे झाला होता. नव्या आयुष्याची सुरुवात करताना सुखी संसाराची स्वप्न पाहणाऱ्या सुकेशनी यांना लग्नानंतर अवघ्या आठ दिवसातच होती दीपक तुकाराम होनसांगडे याने ॲटो खरेदीसाठी माहेरून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केल्याचा आरोप आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी दबाव टाकत त्यांनी मानसिक शारीरिक व त्रास दिला आहे. या तक्रारीवरून दीपक तुकाराम होनसांगडे याच्याविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशिक्षणार्थी उपाधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार ज्ञानोबा केंद्रे पुढील तपास करीत आहेत.




रायगडावरुन राजगृहाकडे या नाटकाच्या प्रयोगाचे उद्घाटन भन्ते विनयबोधी महाथेरो यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ.रत्नदीप गायकवाड, भन्ते डॉ.सत्यपाल महाथेरो, प्रभाकर नांदेडकर, भरतकुमार कानिंदे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडित कदम, गणपतराव गायकवाड, भगवानराव धबडगे, गणेशराव सोंडारे, सा.ना.भालेराव यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# हदगाव येथील उड्डाणपुलाच्या भिंतीत लोखंडी खांब का घुसवले जात आहेत?

शेख चांदपाशा

हदगाव:नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील हदगाव शहराजवळ असलेल्या उड्डाणपुलाच्या भिंतीलगत गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या कामामुळे नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. प्रेशर मशीनच्या साहाय्याने लोखंडी खांब भिंतीत दाबून बसविले जात असल्याचे दिसत असून, या कामाचे नेमके स्वरूप काय, असा प्रश्न नागरिक आणि वाहनधारकांकडून उपस्थित केला जात आहे.

नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील हा उड्डाणपूल वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यामुळे पुलाच्या भिंतीलगत सुरू असलेल्या या कामाचा उद्देश काय?, त्यासाठी कोणते तांत्रिक उपाय योजले जात आहेत आणि या कामाचा पुलाच्या सुरक्षिततेशी काही संबंध आहे का, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे.प्रेशर मशीनच्या साहाय्याने लोखंडी खांब जमिनीत किंवा पुलाच्या भिंतीलगत दाबून बसविण्याचे काम सुरू असल्याचे दृश्य दिसत असले, तरी त्यामागील तांत्रिक कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हे काम कोणत्या मंजूर आराखड्यानुसार सुरू आहे, त्यासाठी संबंधित विभागाची परवानगी घेण्यात आली आहे का आणि पुलाच्या संरचनेच्या सुरक्षिततेची कोणती काळजी घेतली जात आहे, याबाबत अधिकृत माहिती मिळणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड येथील भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांनी या कामाबाबत तातडीने खुलासा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कामाचे स्वरूप, तांत्रिक आवश्यकता आणि सुरक्षिततेसंदर्भातील माहिती प्रशासनाने स्पष्ट केल्यास



नागरिकांमधील संभ्रम दूर होण्यास मदत होईल. उड्डाणपुलाच्या भिंतीलगत नेमके कोणते काम सुरू आहे, लोखंडी खांब बसविण्याची गरज काय आणि पुलाच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाची भूमिका काय, या प्रश्नांची उत्तरे आता एनएचएआयच्या अधिकृत खुलाशातूनच स्पष्ट होणार आहेत.

# रविवारी आयकर-विक्रीकर व्याख्यानमाला

नांदेड/प्रतिनिधी-ॲड.स्व.बंसीलाल काबरा आयकर-विक्रीकर व्याख्यानमालेचे येत्या रविवारी, (दि.१८) हॉटेल चंद्रलोक येथे सकाळी ९.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. जीएसटी आणि आयकर क्षेत्राशी संबंधित विषयावर दोन व्याख्याने आयोजित केली गेली आहेत. नागपूर येथील जीएसटी तज्ञ प्रीतम बत्रा हे जीएसटीमधील मुख्य बदल या विषयावर तर ॲड.बालाजी राजे (नांदेड) हे आयकरमधील झालेल्या बदलावर व्याख्यान देणार आहेत.

ज्येष्ठ कर सल्लागार स्व.बंसीलाल काबरा यांच्या स्मृतिनिमित्त दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. व्याख्यानमालेचे उद्घाटन महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलचे अध्यक्ष डॉ.संजय कदम यांच्या हस्ते होईल. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील फिजिशयन डॉ.पुरुषोत्तम डाड हे राहणार आहेत. कार्यक्रमात सी.ए. किशन माठोरे नांदेड आणि सी.ए. शंकर गुंडलवार यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य संयोजक ॲड.सी.बी. दागडीया, ॲड. जयप्रकाश काबरा, सीए प्रवीण पाटील, गंगाबिशन कांकर, सीए विजय मालपानी, ओमप्रकाश पोकर्णा, वसंत मैय्या, सीए जयप्रकाश फलोर, अली भाई पंजवानी, शंभूभाई भानु, सीए पी.एच. गट्टानी, सीए गोविंद मुंदडा, सीए हर्षद शहा, रामचंद्र रंगनानी, कृष्णा शेवडीकर, कमल कोठारी, सीए मनोहर आयलाने, ॲड.अनिल जोशी, रविंद्रसिंह मोदी, सीए प्रशांत काबरा, सीए प्रतीक काबरा यांनी केले आहे.

# अर्धापूर शिवारात युवकाचा तिक्ष्ण हत्याराने खून

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ते हिंगोली महामार्गावरील अर्धापूर शिवारात दि.१० ऑक्टोबर रोजी वसमत तालुक्यातील एका २५ वर्षीय युवकाचा तीक्ष्ण हत्याराने वार करुन खून केल्याची घटना घडली आहे.

अनिल गौतम किर्तने (वय २५) रा.असोला ता.औंढा ह.मु. कौठा रोड,बसमत या युवकावर दि.१० ऑक्टोबर रोजी आरोपींनी तीक्ष्ण हत्याराने डोक्यावर, छातीवर व गळ्यावर वार करुन त्याचा खून केला. घटनेनंतर आरोपी पळून गेले आहेत. याप्रकरणी अज्ञात आरोपी विरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गौतम किर्तने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनी कांबळे करीत आहेत.


## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १५७२/२०२६
शोभा व ईतर वि. निरंक
ने.ता.२७/११/२०२६

अर्जदार:- १. शोभा साईनाथ पातावार, वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम, २. सचिन पि.साईनाथ पातावार, वय : ४१ वर्षे, धंदा : खाजगी नौकरी, ३. शशिकांत पि.साईनाथ पातावार, वय : ४० वर्षे, धंदा : खाजगी नौकरी, ४. श्रीकांत पि.साईनाथ पातावार, वय : ३९ वर्षे, धंदा : खाजगी नौकरी, ५. सुशिल पि.साईनाथ पातावार, वय : ३५ वर्षे, धंदा : खाजगी नौकरी, सर्व रा.एन.डी.४२, डी-१८/६, सिडको, नविन नांदेड ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत साईनाथ पि.एकनाथ पातावार यांचा मृत्यु दिनांक २३/०७/२००४ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ ते ५ हे मयताचे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी क्रमांक १ ते ५ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



जा.क्र.मनपा/क्षे.का.३/४१३/२०२६-२७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०४/०९/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.६६/क्षे.का.क्र.०३/४०/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री.**रविकिरण चंद्रकांत पालकृतवार** रा. **शिवाजीनगर,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सिटी सर्वे नं.**४३५७/गाव नमुना -- पैकी प्लॉट नं. दुकान** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-२-१८३ (पीन नं. ४०१०१०१७२६)** हे वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी यांचे **सुधाकर दत्तात्रय कोतावार** नावे कर अकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने ओनरशिप पध्दतीने दुकानाचे वारसा अधारे/खरेदीखत क्र./प्लॉट अलाऊटमेंट क्र./मृत्यु प्रमाणपत्र क्र./बक्षिसपत्र/**विक्रीखत क्र.३४९० दि.२१.०५.२०१५** च्या आधारे विकत घेतली आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्वेस**- विक्री करणार यांचे राहते घर आहे, **पश्चिमेस-** २५ फुट रुंदीचा रोड आहे, **दक्षिणेस-** गिता मंदीराची मालमत्ता आहे, **उत्तरेस-**भास्कर कोतावार यांचे दुकान आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड



जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/१५२०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : ०९/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१५०२५/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की श्री **विनय हिरामण मोरे** रा.**तरोडा बु.,नांदेड** या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०/१०/२००९ तरोडा बु. गट नं.२५७ पैकी प्लॉट क्रं.४१ पिन क्र.४०६१३०२००६१** श्री. **गणेशराव रामराव लोखंडे व इतर** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.६८१७ दि.२८/०७/२०२५** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- १२.०० मी.रुंद रोड आहे, **पश्चिम-**सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग आहे, **दक्षिण-**प्लॉट क्र.४२ आहे, **उत्तर-**प्लॉट क्र.४० आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड



जा.क्र./क्षेकाक्रं.५ ईतवारा/नापवि/८८८/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : १४/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.१२४/४०/क्षे.का.क्र.०५/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **मंगल चंद्रकांत जंपलकर** रा.**सिध्दनाथपुरी,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, शिट शेत/सर्वे नं.-**सि.स.नं.१४११० पैकी,** फ्लॅट नं.- आहे. **(एकुण क्षेत्रफळ १८३.५० चौ.मी.)** महानगरपालिका मालमत्ता नं.**८-४-१२४, पैकी, पिन नं.(४०३०८०१३५५) विक्रीखत दस्त क्र. ८१३१/२०२६ दि.१७/८/२०२६ श्रीमती कांताबाई तुकाराम देशमुख व इतर,** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांच्याकडून अर्जदाराने वारसा/आधारे/पी.आर.कार्ड **७/१२/ दि.२१-०९-२०२६** आधारे विकत घेतली आहे. मालकी हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या संबंधात कोणास कांही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# किनवट बाजार समितीच्या पाच वर्षांच्या कारभाराची चौकशी आठ आठवड्यांत

## उच्च न्यायालयाचे निर्देश;जमीन विक्रीसह आर्थिक अनियमिततांच्या तक्रारी

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील पाच वर्षे दरम्यानच्या आर्थिक घोटाळ्यासह प्रशासकीय अनियमिततांचा मुद्द्यांवर प्राधिकरणाने चौकशीला दिरंगाई केल्याने सभापतींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. गोकुंद्दा येथील जमीन विक्रीसह लेखापरीक्षणातील आक्षेप आणि विविध मुद्द्यांच्या निवेदनावर आठ आठवड्यांच्या आत गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्याचे न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाला निर्देश दिले आहेत.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांनी ३० जून रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्याकडे निवेदन सादर केले होते. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२२ या कालखंडातील समितीच्या आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी त्यांची मागणी होती. मात्र, संबंधित प्रशासनाने मवाळ भूमिका घेतल्यामुळे सभापतींनी उच्च न्यायालयात धाव घेतली, त्याचा परिपाक म्हणून न्यायालयाने प्राधिकरणाला आठ आठवड्यांत गुणवत्तेआधारे निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याने प्राधिकरणाच्या गळ्यात चौकशीची बागदोर अडकवलीय. प्राधिकरण निष्पक्ष चौकशी करून कारवाई करणार काय? या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागने स्वाभाविक आहे. निवेदनातील मुद्दे केवळ लेखापुस्तकांतील आकड्यांपुरते मर्यादित नसून, बाजार समितीच्या आर्थिक शिस्तीशी आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रियेशी संबंधित आहेत. गोकुंद्दा येथील जमीन विक्री, अनामत रकमेच्या वसुलीचा तपशील, बाजार शुल्काचा भरणा, विविध खर्चांची देयके, कर्मचारी भरतीची पद्धत, जमीनविक्रीशी निगडित व्यवहार तसेच लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप यांची मूळ अभिलेखांच्या आधारे पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र विशेष फेरलेखापरीक्षण करण्याचा आग्रहही निवेदनात धरण्यात आला आहे. निष्पक्ष तपासणीतून व्यवहारांमागील वस्तुस्थिती, आर्थिक नोंदींची विश्वासार्हता आणि निर्णयप्रक्रियेतील संभाव्य त्रुटी स्पष्ट होऊ शकतील, अशी अपेक्षा या मागणीमागे आहे.

या प्रकरणी दाखल रिट याचिकेवर १२ ऑक्टोबर रोजी न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने संबंधित प्राधिकरणाला न्यायालयाच्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून आठ आठवड्यांच्या आत निवेदनावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले. त्यानंतर याचिका निकाली काढण्यात आली. संबंधित निवेदनावर निर्णय घेण्यासाठी आता स्पष्ट कालमर्यादा निश्चित केली आहे. मात्र, न्यायालयाने कथित गैरव्यवहार सिद्ध झाल्याचा निष्कर्ष नोंदवलेला नाही किंवा विशेष फेरलेखापरीक्षणाचे आदेश दिल्याचेही उपलब्ध तपशिलातून स्पष्ट होत नाही. त्यामुळे पुढील प्रक्रिया आणि संबंधित प्राधिकरणाचा निर्णय यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पाच वर्षांच्या कारभाराविषयी उपस्थित झालेल्या प्रश्नांना कागदोपत्री उत्तर मिळणार की हे प्रकरण केवळ निर्णयापुरते मर्यादित राहणार? या प्रश्नाचे उत्तर आता संबंधित प्राधिकरणाच्या भूमिकेतून स्पष्ट होईल. बाजार समितीच्या आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि अभिलेखाधारित निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत असून, पुढील आठ आठवडे या प्रकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत.

## जिल्ह्यात १७ व १८ रोजी वादळी पावसाचा येलो अलर्ट

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १७ व १८ ऑक्टोबर या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्यासह विजांच्या कडकडाटात व ढगांच्या गडगडाटात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, तसेच नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# देगलूरमध्ये ऐन सणासुदीत अशुद्ध टाक्यातून खाद्यतेलाची विक्री

## अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात काही ठिकाणी खुल्या खाद्यतेलाची विक्री करताना स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या नियमाकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. अस्वच्छ टाक्यांमध्ये खाद्यतेल साठवून त्यांची विक्री केली जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासनाचे लक्ष आहे का?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

खाद्यतेल हा प्रत्येकाचा दैनंदिन आहारातील महत्त्वाचा घटक आहे, मात्र, देगलूर शहरात तालुक्यातील काही भागात तेल साठवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या टाक्यांची स्वच्छता, त्यांना झाकण आहे की नाही आणि तेलाची हाताळणी सुरक्षित पद्धतीने होती की नाही, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अशा परिस्थितीत तेलाची गुणवत्ता आणि नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता तपासणी गरजेचे आहे. खुल्या खाद्यतेलाची विक्री करणाऱ्या केंद्राची नियमित तपासणी करून तेलाची गुणवत्ता, साठविणुकीची पद्धत, टाक्यांची स्वच्छता आणि आवश्यक परवानग्याची पडताळणी करणे ही संबंधित यंत्रणेची महत्त्वाची जबाबदारी आहे, मात्र, अस्वच्छ साठवूनिकीबाबत तक्रारी आणि प्रश्न उपस्थित असतानाही ठोस तपासणी व कारवाई दिसून येत नसल्याचा आरोप नागरिकाकडून केला जात आहे. अस्वच्छ वातावरणात साठवलेले किंवा अयोग्य पद्धतीने हाताळलेले खाद्य तेल आरोग्यसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे केवळ विक्री सुरू आहे म्हणून दुर्लक्ष न करता, तेलाची गुणवत्ता आणि अन्नसुरक्षाचे नियम काटेकोरपणे तपासण्याची गरज आहे.

**कारवाईचा बडगा उगारणार का?**

अन्न व औषध प्रशासनाने देगलूर शहरासह संपूर्ण तालुक्यातील खाद्यतेल विक्री केंद्राची तपासणी मोहीम राबवावी, नागरिकांच्या आरोग्याची संबंधित विषयात प्रशासन आणखी ती काळ दुर्लक्ष करणार? अस्वच्छ टाक्यामधून खाद्यतेल विक्री होत असल्याच्या तक्रारीची दखल घेऊन संबंधित विभाग प्रत्यक्ष तपासणी करणार का आणि कारवाई होणार का, याकडे आता देगलूर शहर व तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पदवीधर मतदारांना मतदानासाठी पाठवले ग्रामीण भागात

## धर्माबादेत निवडणूक प्रशासनाचा सावळा गोंधळ

धर्माबाद/प्रतिनिधी-मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत धर्माबाद शहरात निवडणूक प्रशासनाचा संतापजनक सावळागोंधळ समोर आला आहे. शहरातील सुशिक्षित पदवीधर मतदारांची मतदान केंद्रे चक्क सिराजखोड या ग्रामीण भागात ठेवण्यात आल्यामुळे मतदारांमध्ये तीव्र असंतोष आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

धर्माबाद शहरातील मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा हा डाव आहे का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. मतदारांना मतदानासाठी दुसऱ्या गावातील सिराजखोड केंद्रावर जावे लागणार आहे. मतदारांची संख्या वाढली होती, तर धर्माबाद शहरातच दोन मतदान केंद्रे का निर्माण करण्यात आली नाहीत? पदवीधर निवडणुकीत आधीच मतदानाचा टक्का कमी असतो. त्यात केंद्र लांब केल्याने मतदानावर गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. या गंभीर चुकीमुळे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी या निवडणुकीचे गांभीर्य घेतले नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.सर्वात सुशिक्षित मतदारसंघ असलेल्या या निवडणुकीत प्रशासनाकडून झालेली ही चूक अत्यंत हास्यास्पद आणि तितकीच गंभीर आहे. याप्रकरणी रमेशचंद्र तिवारी यांनी थेट राज्य निवडणूक आयोग आणि जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून मतदारांची गैरसोय करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# युट्यूबरची गोळ्या झाडून हत्या;२४ तासांत तीन आरोपी जेरबंद

ठाणे:उल्हासनगर रेल्वे स्थानक परिसरात प्रसिद्ध युट्यूबर हरेश गजवानी यांची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना बुधवारी रात्री घडली. या घटनेमुळे ठाणे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, विठ्ठलवाडी पोलिस आणि ठाणे गुन्हे शाखेने संयुक्त तपास करत २४ तासांच्या आत तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. अवैध जुगार अड्ड्यांविरोधात आवाज उठविल्याच्या रागातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे.

बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास हरेश गजवानी हे उल्हासनगर रेल्वे स्थानक परिसरातून जात असताना हल्लेखोरांनी त्यांना गाठले. आरोपींनी त्यांच्या डोक्यात जवळून दोन गोळ्या झाडल्या. त्यानंतर कोयत्यानेही वार केले. या हल्ल्यात गजवानी यांचा मृत्यू झाला. वर्दळीच्या परिसरात अचानक गोळीबार झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच विठ्ठलवाडी पोलिसांनी तीन पथके तयार करून तपास सुरू केला. ठाणे गुन्हे शाखेनेही समांतर तपास केला. तांत्रिक माहितीच्या आधारे अविनाश नायडू, विजय पुरणसिंग आणि नूर आलम खान या तिघांना ताब्यात घेण्यात आले. या तिघांचा हत्येत सहभाग असल्याचा संशय असून, त्यांची चौकशी सुरू आहे. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या माहितीनुसार, पूर्ववैमनस्यातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. हरेश गजवानी हे उल्हासनगरमधील कथित अवैध जुगार अड्ड्यांविरोधात सातत्याने तक्रारी करत होते. याच रागातून त्यांची हत्या झाली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. यापूर्वी गजवानी आणि आरोपीं विरोधात उल्हासनगर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल असल्याची माहितीही समोर आली आहे.

# देगलूर पोलीस ठाणे राज्यात दुसरे;५० हजारांचे बक्षीस जाहीर

देगलूर/प्रतिनिधी-पोलीस प्रशासनातील उत्कृष्ट कामगिरी, कार्यक्षमता आणि कर्तव्य निष्ठेच्या बळावर देगलूर पोलीस ठाण्यांने राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.'सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे २०२२'या निवडीमध्ये देगलूर पोलीस ठाण्याने राज्यातील पहिल्या पाच पोलीस ठाण्यामध्ये स्थान पटकावले असून, द्वितीय क्रमांकाचे ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्याच्या पोलीस दलासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने निर्धारित केलेल्या निकषानुसार राज्यस्तरीय समितीने सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्याची निवडणूक केली. या निवड प्रक्रियेत देगलूर पोलीस ठाण्याची द्वितीय क्रमांकासाठी शिफारस करण्यात आली. त्यानुसार अप्पर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्राची यांनी देगलूर पोलीस ठाण्यास ५० हजार रुपयांच्या रोख पारितोषिकास मंजुरी दिली आहे. या यशात तत्कालीन प्रभारी पोलीस निरीक्षक सोहन माछरे यांच्यासह पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि अमलदारांची योगदान महत्त्वाचे ठरले आहे. पोलीस ठाण्याच्या कामकाजातील शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि सामूहिक प्रयत्नाची दखल या सन्मानातून घेण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट पोलअंतर्गत-२०२२ अंतर्गत राज्यस्तरावर निवड झालेल्या पोलीस ठाण्यामध्ये कोल्हापूर येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्याने प्रथम, नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलीस ठाण्यांने द्वितीय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मधील विरगाव पोलीस ठाण्यांने तृतीय, पिंपरी चिंचवड मधील भोसरी पोलीस ठाण्यांने चौथा, तर कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ पोलीस ठाण्याने पाचवा क्रमांक मिळवला आहे. या पाचही पोलीस ठाण्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची पारितोषिक मंजूर करण्यात आली आहे. देगलूर पोलीस ठाणे द्वितीय क्रमांक मिळवलेला हा सन्मान केवळ एका पोलीस ठाण्याचा गौरव नसून, नांदेड जिल्ह्याच्या पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा होणारा आहे.

# मौ.नेवरवाडी शिवारात तीन लाखाचे सोयाबीन आरोपीने जाळले

नांदेड/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यातील मौजे नेवरवाडी शेत शिवारात एका शेतकऱ्याने साठवून ठेवलेले तीन लाख रुपये किंमतीचे सोयाबीन जाळण्याची घटना गेल्या आठवड्यात घडली आहे.

दत्ता शिवाजी बोडके रा.नेवरवाडी ता.हदगाव, धंदा शेती यांनी आपल्या शेतात सोयाबीनची कापणी करुन ढिग लावून ठेवले होते. दि.७ ऑक्टोबरच्या रात्री अज्ञात आरोपींनी शेतात ढिग लावून ठेवलेल्या सोयाबीनला आग लावली. या आगीत ३ लाख रुपये किंमतीचे सोयाबीन जळून खाक झाले आहे. त्यामुळे शेतकरी दत्ता बोडके यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. अगोदरच हदगाव तालुक्यात दुष्काळ पडलेला आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांची पिके करपून गेली आहेत. अशा कठीण परिस्थितीत दत्ता बोडके यांचे शेतातील सोयाबीन उगवले होते. परंतु आरोपींनी सदरील सोयाबीन जाळून मोठे नुकसान केले आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुध्द मनाठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांतर्फे विविध मागण्यांसाठी दोन दिवस काळया फिती लावुन कामकाज

नांदेड/प्रतिनिधी-मा.उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या समकक्ष वेतनश्रेणी लागु व्हावी या प्रमुख मागण्यांसाठी सुरु असलेल्या आंदोलनाच्या दुसरा टप्पा १६ व १७ ऑक्टोबर रोजी पार पडणार असून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी काळया फिती लावुन कामकाज करित शासनाचा निषेध व्यक्त करणार आहेत.

उच्च न्यायालयातील न्यायमुर्तीच्या विशेष समितीकडुनही कर्मचाऱ्यांच्या समान वेतनाबाबतचा अहवाल शासनाच प्राप्त होवुनही न्यायालयीन कर्मचाऱ्यांना प्रश्न निकाली निघत नसल्यामुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांचीच न्याय मिळविण्यासाठी कुंचबना होत असून कर्मचारी वर्गात तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे दि.१६ ऑक्टोबर व दि.१७ ऑक्टोबर रोजी पुन्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी काळया फिती लावुन आपले दैनंदिन कामकाज करित शासनाचा अनोख्या पध्दतीने निषेध व्यक्त करणार आहेत तर दुसरीकडे १७ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व निवृत्त न्यायालयीन कर्मचारी हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी धरणे आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधणार आहेत. सदरील आंदोलनाची दखल न घेतल्यास नियोजित आंदोलन पुढे सुरुच राहणार असून यंदाची दिवाळी साजरी न करता येत्या ५ नोव्हेंबर रोजी राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी हे सामुहिक रजेवर जाणार असून पुढे १७ नोव्हेंबर पासुन बेमुदत संप पुकारण्याचा निर्धार केला आहे. सदरील आंदोलनात न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नांदेड जिल्हा न्यायालयीन तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री एन.एस.गिरगावकर, सचिव श्री विनोद पाथरकर, यांच्यासह नांदेड जिल्हा सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघाचे अध्यक्ष एस.पी.कोटगीरे आदिंनी केले आहे.

पान १ वरुन

## निवडणूक आयोगाला...

या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने संबंधितांच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित केले. न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले. मोर्चाप्रकरणी दाखल याचिकेवर राहुल गांधी, अखिलेश यादव आणि अन्य संबंधितांना आपली बाजू स्पष्ट करण्याची संधी देण्यात आली आहे. दुसरीकडे, दिल्लीतील जंतरमंतर हे अधिकृत आंदोलनस्थळ म्हणून अधिसूचित नसल्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेचीही सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. या प्रकरणी केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांना नोटीस बजावून उत्तर मागविण्यात आले आहे. त्यामुळे मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासोबतच राजधानीतील आंदोलनाच्या अधिकाराचा मुद्दाही न्यायालयीन चर्चेत आला आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरील आक्षेप, मतदार याद्यांतील कथित अनियमितता आणि न्यायालयाच्या दिशेने काढलेल्या मोर्चावरून निर्माण झालेल्या वादामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने बजावलेल्या नोटिशींवर संबंधित पक्ष काय उत्तर देतात आणि पुढील सुनावणीत कोणते मुद्दे समोर येतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

## जि.प.चे माजी अधिकारी...

हत्यार उपसले आहे. प्रलंबित मागण्यांचा निपटारा करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, यासाठी त्यांनी या प्रतीकात्मक आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.प्रशासकीय यंत्रणेत वरिष्ठ पदावर काम केलेल्या व्यक्तीलाच न्यायासाठी अशा प्रकारे रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हा परिषद प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन ठोस निर्णय घेणार, की हा आवाजही कागदपत्रांच्या ढिगाऱ्यात दडपला जाणार, याकडे नांदेडकरांचे लक्ष लागले आहे.

## सीजेपीच्या पत्रकार परिषदेत...

येण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले आहे. याच पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, परिषदेत झालेल्या घोषणाबाजीमुळे आंदोलनाच्या मुद्द्याबरोबरच गोंधळाचीही चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, जंतरमंतर परिसरातील आंदोलनावरील निर्बंध आणि पोलिसांच्या कारवाईवरून वाद निर्माण झाला आहे.

# व्यसनमुक्त अभियानातून तरुणांना दिशा-ज्योती बहनजी

कंधार/प्रतिनिधी-तरुण पिढीला व्यसनांपासून दूर ठेवून तिच्यामध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करणे, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडविणे आणि त्यांना उज्वल भविष्याची दिशा देणे, या उद्देशाने दहा कोटी व्यसनमुक्तीपर प्रतिज्ञा महाभियानांतर्गत कंधार परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. १४ रोजी पेठवडज येथील पब्लिक स्कूल तसेच श्री सिद्धिविनायक अॅकॅडमी येथे हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ब्रह्माकुमारी उपसेवा केंद्र, कंधारच्या संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती बहनजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजच्या डिजिटल युगात मोबाईलचा अतिवापर, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि वाईट संगत यांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, आरोग्यावर व व्यक्तिमत्त्वावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा गोष्टींपासून सावध राहून जीवनात उच्च ध्येय निश्चित करावे. शिस्त, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास साधावा. चुकीच्या सवयींना ठामपणे नकार देत व्यसनमुक्त युवा बनावे, असे आवाहन ज्योती बहनजी यांनी केले. सौ. जनाताई नाकाडे, पत्रकार उज्वलाताई गुरुसुडकर, ब्रह्माकुमार सतीशभाई, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वाईट सवयींपासून दूर राहून अभ्यास, शिस्त आणि चांगल्या संस्कारांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

# वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

नांदेड/प्रतिनिधी-भारतरत्न, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच त्यांच्या जीवनकार्यावर आधारित ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा सांख्यिकी अधिकारी अर्जुन झाडे यांच्या हस्ते करण्यात आले.भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न तरुणाईच्या मनात रुजविणारे आणि आयुष्यभर वाचनाची आवड जोपासणारे डॉ. कलाम यांचे विचार नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४